
# नाशिक ग्रामीण पोलीस दल
# क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी 100 दिवसांचा कृती आराखडा


# संकेतस्थळ ( WEBSITE )


## https://www.nashikruralpolice.gov.in/


- **वापरण्यास सुलभ** – सदर संकेतसथळ हे दोन्ही भाषेत (इंग्रजी आणि मराठी ) उपलब्ध आहे. ऑनलाईन तक्रार दाखल करण्यास सुलभ आहे.
- **अद्ययावत माहिती** – हेल्पलाईन माहिती, सर्व टोल फ्री क्रमांक आणि पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी संपर्क क्रमांक, पत्ता, छायाचित्रे, ईमेल आयडी देण्यात आले आहेत.
- **RTI** अंतर्गत वेळोवेळी माहितीचे प्रकटीकरण केले जाते.
- **संकेतस्थळ सुरक्षा व देखभाल** – सेक्युरीटी ऑडीट करण्यात आले असून, AWS इंडिया क्लाउडवर बॅकअप राखून ठेवलेले आहे.
- **सेवा हक्क कायदा पोर्टल** – नागरीकांसाठी ऑनलाईन फॉर्म, सेवांसाठी अभिप्राय फॉर्म.
- **नागरीकांसाठी सुविधा/जनजागृती :-** संकेतस्थळावर नागरिकांना आपल्या तक्रारी/अभिप्राय साठी QR CODE देण्यात आलेला आहे. नागरीकांसाठी सायबर सुरक्षेबाबत माहिती, पारपत्र सध्य स्थिती, पोलीस भरतीबाबत जाहिरात / माहिती, अपघात भरपाई तसेच इतर सुविधा याबाबत माहिती.
- **ऑनलाइन तक्रार सुविधा :-** उद्योजकांना आपल्या तक्रारी सोयीस्कर पद्धतीने मांडण्यासाठी संकेतस्थळावर स्वतंत्र पर्याय दिला आहे.

https://www.nashikruralpolice.gov.in/



# सुकर जीवनमान ( EASE OF LIVING )

- अभ्यागतांसाठी व्यवस्थापन प्रणाली राबविण्यात येते त्यात अभ्यागतांचा तपशिल उद्देश, तक्रारींचे निवारण आणि अभिप्राय नोंद करण्यात येते.
- सर्व पोलीस ठाणे, कार्यालयांना **'अभ्यागत मदत कक्ष'** (Visitors Help Desk) सुरु करण्यात आला आहे.
- **E SWIMS** प्रणाली चे दि. 25/02/2025 रोजी अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आले असुन दि. 01/07/2025 पासून सदर प्रणाली सुरू करण्यात आली आहे.
- **पारपत्र व चरित्र पडताळणी**

| विवरण | 07/01/25 पावेतो प्रलंबित प्रकरणे | 07/01/25 ते आज पावेतो प्राप्त प्रकरणे | 07/01/25 पावेतो निर्गती प्रकरणे | 07/01/25 ते आज पावेतो प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|
| पारपत्र | 272 | 5759 | 5561 | 198 |
| चरित्र पडताळणी | 91 | 11592 | 11175 | 507 |

## अभ्यागत भेट






E SWIMS बाबत मा. न्यायालयासोबत बैठक

## अभ्यागतांचे अभिप्राय फॉर्म

**पोलीस मदत कक्ष ,तक्रार निवारण फॉर्म**

[आम्ही आपल्याला अधिक चांगली सेवा देऊ इच्छितो, त्यासाठी कृपया हा फॉर्म भरावा.]

१) पोलीस ठाणे :- पिंपळगांव (ब)

२) अभ्यागताचे नांव :- [illegible]

३) अभ्यागत मोबाईल क्रमांक :- [illegible]

४) कोणत्या विभागाशी तुमची समस्या संबंधीत आहे ? (खालील पैकी योग्य ते विभाग निवडा/टिक चिन्हा लावा) :-

१) गुन्हे ✓    २) कायदा व सुव्यवस्था

३) वाहतुक व अपघात    ४) पासपोर्ट / चारित्र्य पडताळणी

५) परवानगी मिरवणुक ,उत्सव,शस्त्र    ६) हरविलेली मालमत्ता

७) सायबर गुन्हे    ८) पोलीस संरक्षण

९) अन्य

५) कोणत्या अधिकारी / अंमलदार यांना भेटायचे आहे .

१) पोलीस ठाण्याचे प्रभारी

२) डे अधिकारी /ठाणे अंमलदार ✓

३) अन्य

६) आगमन तारीख व वेळ :- दि. १२/०२/२०२४ [illegible] १०:०० वा.

७) निर्गमन तारीख व वेळ :- दि. १२/०२/२०२४ [illegible] १०:१५ वा.

८) तक्रार निवारण झाली का ?

१) होय ✓

२) नाही (नसल्यास तर कारण स्पष्ट करा)

९) आमच्या सेवेचे मुल्यांकन (१ ते ५) (१ = अत्यल्प समाधान, ५ = सर्वोत्तम)

१.   २.   ३.   ४.   ५.

१०)अतिरिक्त अभिप्राय / सूचना(उदा. प्रतीक्षा वेळ कमी करण्यासाठी उपाय, कर्मचाऱ्यांचे वर्तन, सुविधांची स्वच्छता इ.) :-

सूचना :-

१)या फॉर्मचा उद्देश :- नागरीकांना चांगल्या सेवेबद्दल मार्गदर्शन करणे व सेवा मिळाली किंवा कसे याबाबत मुल्यांकन करणे.

२)फॉर्म कोठे उपलब्ध:- हा फॉर्म पोलीस ठाण्यातील मदत कक्षात उपलब्ध राहील.

३)फॉर्म भरल्यानंतर काय करावे:- पूर्ण भरलेला फॉर्म मदत कक्ष अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे जमा करा, त्या बदल्यात तुम्हाला "फॉर्म क्रमांक" दिला जाईल, जो पुढील चौकशी किंवा तक्रार निवारण प्रक्रियेत उपयुक्त ठरेल.

(तुमच्या सहकार्याबद्दल धन्यवाद! तुमचे अभिप्राय आम्हाला सेवा सुधारण्यासाठी मदत करतात.)

हेल्प डेस्क अधिकारी / अंमलदार
स्वाक्षरी :- [signature]
नाव :- [illegible]
दिनांक :- १२/०२/२०२४

अभ्यागत
स्वाक्षरी :-
नाव :- [illegible]
दिनांक :- १२/०२/२०२४

# स्वच्छता ( CLEANLINESS )

- सर्व  पोलीस ठाणे मध्ये अभिलेख ठेवणेसाठी **6 गठ्ठे पध्दत**, व **अ,ब,क,ड** वर्गवारी करण्यात आलेली आहे.
- सर्व उपविभागीय कार्यालय, पोलीस स्टेशन आणि शाखा यांनी  कालबाह्य अभिलेख नाश करण्याचे काम पूर्ण केले असून एकूण **90360** कालबाह्य अभिलेख (फाईल व रजिस्टर ) नाश केला आहे
- सर्व पोलीस ठाणे यांनी जुन्या व निरूपयोगी जड वस्तुंची विल्हेवाटसाठी यादी केली व जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावत केली आहे. 2630 इतक्या निरूपयोगी जड वस्तुंची विल्हेवाट लावण्यात आली आहे.
- **138** जुन्या नादुरूस्त पोलीस वाहनांपैकी  **113** वाहने मानद कार्यप्रणाली नूसार निर्लेखीत केले.
- अपघात, बेवारस व गुन्हयांमधील  **3932** पैकी **1031** वाहनांची निर्गती करण्यात आली आहे.

Before

After









# तक्रार निवारण
# (GRIEVENCE REDRESSAL)

- **तक्रार निवारण दिवस** – प्रत्येक **शनिवारी 10:00 - 13:00** या वेळेत सर्व पोलीस ठाणे मध्ये वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेण्यात येवून आजपावेतो **7303** तक्रारींची निर्गती करण्यात आली.
- पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि सर्व 40 पोलीस ठाणे येथे अभ्यागत भेटीच्या **वेळेचे फलक** लावले आहेत.
- **आपले सरकार पोर्टल - पी जी पोर्टल अर्ज**

| आपले सरकार पोर्टल | | | पी जी पोर्टल | | |
|---|---|---|---|---|---|
| 07/01/2025 ते 15/04/2025 पावेतो | | | 07/01/2025 ते 15/04/2025 पावेतो | | |
| एकुण | निर्गती | प्रलंबित | एकुण | निर्गती | प्रलंबित |
| 133 | 103 | 30 | 20 | 16 | 04 |

- 01 जाने. 2025 पूर्वीचे PG Portal व आपले सरकार पोर्टल वरील सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

# नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस तक्रार निवारण दिन सन - २०२५ दर शनिवार घेण्यात आलेल्या तक्रार निवारण दिनाचे छायाचित्रे
















शहर / जिल्हा

नाशिक | मंगळवार, २५ मार्च २०२५ | nashik.mtonline.in

## सहा हजार तक्रारींचे निवारण

### पोलिस अधीक्षक कार्यालयाचा पुढाकार; उर्वरित प्रकरणांत न्यायालयात दाद मागण्याचा सल्ला

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

गावातील तंटे, जमिनीवरून भाऊबंदकी-शेजाऱ्यांतील वाद, आर्थिक फसवणुकीसह कौटुंबिक समस्यांची गाऱ्हाणी अशा सहा हजार ३३४ तक्रारींचा तत्काळ निपटारा करण्यात गत तीन महिन्यात जिल्हा पोलिसांना यश आले आहे. उर्वरित प्रकरणांमध्ये न्यायालयात दावा दाखल करण्याचा सल्ला पोलिसांनी दिला असून, नागरिकांनीही यंत्रणेच्या भूमिकेचे स्वागत केले आहे. यासह पोलिसिंग संबंधित अपेक्षा व वाहतूक सुरक्षेबाबत काही तक्रारीदेखील नागरिकांनी यंत्रणेसमोर ठेवल्या असून, त्यावरील नियोजन जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाने सुरू केले आहे.

**दृष्टिक्षेप**

- १० जानेवारी २०२५ रोजी पहिला तक्रार निवारण दिन
- २२ मार्च २०२५ पर्यंत दहा तक्रार निवारण दिन
- २२ मार्चपर्यंत ६ हजार ३३४ तक्रारींचा निपटारा
- २२ मार्च रोजी २७३ तक्रारींचे निवारण
- प्रत्येक शनिवारी २००-३०० तक्रारी दाखल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व शासकीय विभागांसाठी शंभर दिवसांचा कृती आराखडा जारी केला असून, त्यानिमित्ताने नाशिक ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयाने तक्रार निवारणावर भर दिला आहे. पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने यांच्या आदेशान्वये, प्रत्येक शनिवारी विभागनिहाय व पोलिस ठाणेनिहाय तक्रार निवारण करण्यात येत आहे. त्या कार्यपद्धतीवर नाशिकचे अपर पोलिस अधीक्षक आदित्य मिरखेलकर आणि मालेगावचे अपर पोलिस अधीक्षक तेगबीरसिंह संधू हे लक्ष ठेवून आहेत. यासह प्रत्येक विभागाच्या उपअधीक्षकांमार्फत पोलिस ठाणेनिहाय आढावा घेण्यात येत आहे.

दरम्यान, प्रत्येक पोलिस ठाण्यास वरिष्ठ अधिकारी भेट देत असून, फिर्यादी व तक्रारदारांना बोलावून त्यांचे समुपदेशन करण्यासह वाद मिटविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे नागरिकांनीही ग्रामीण पोलिसांच्या या मोहिमेचे स्वागत केले आहे. यासह प्रत्येक वेळी अधीक्षक कार्यालयात जाण्याऐवजी पोलिस ठाणेस्तरावरच आता प्रकरणांचा जलद निपटारा होत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. तंटामुक्त गाव अभियानात गावातील तंटे गावातच मिटविणे हा प्रमुख उद्देश आहे.

पोलिस अधीक्षक कार्यालयाने पोलिस ठाणेनिहाय तंटे त्याच स्तरावर मिटविण्यास प्राधान्य देत 'चौकटी बाहेरील' पोलिसिंगला केलेली सुरुवात झटपट तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.

नागरिकांच्या तक्रारी ऐकूण घेताना जिल्हा पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने व अधिकारी.

> तीन महिन्यांत जिल्ह्यातील हजारो प्रकरणांचा त्वरित निपटारा झाला असून, काही प्रकरणांत दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे नोंदविण्याची कार्यवाही सुरू आहे. काही तक्रारी दिवाणी स्वरूपाच्या असल्याने महसूल विभाग व दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचा सल्ला तक्रारदारांना दिला आहे.
>
> \- विक्रम देशमाने, पोलिस अधीक्षक, नाशिक ग्रामीण



# कार्यालयीन सोईसुविधा ( AMENITIES )

- **पिण्याचे पाण्याची** सुविधा सर्व कार्यालये व पोलीस ठाणेस उपलब्ध आहे.
- कार्यालये व पोलीस ठाणेस महिलांसाठी व अभ्यागतांसाठी स्वच्छ **प्रसाधनगृहाची** सुविधा उपलब्ध आहे .
- सर्व पोलीस ठाणेस अभ्यगतांसाठी **सुसज्ज प्रतिक्षालय** तयार करण्यात आले आहे.
- नाशिक ग्रामीण घटकात पोलीस ठाण्यांमध्ये रंगकाम, नुतनीकरण, वृक्षारोपण मोहिम, **सुशोभीकरण** कामे करण्यात आली आहेत.
- सर्व कार्यालयांमध्ये सुव्यवस्थित **नामफलक** व **दिशादर्शक** फलक लावण्यात आलेले आहेत.







सटाणा पोलीस ठाणे
- प्रतिक्षालय -
महाराष्ट्र पोलीस
सुस्वागतम्




१०
११ ठाणे अंमलदार
बिनतारी संदेश


आयशा नगर पोलीस ठाणे
तळ मजला
• वपोनि कक्ष
• स्वागत कक्ष
• पोलीस ठाणे अमलदार
• CCTNS
• बिनतारी संदेश यांत्रणा
पहिला मजला
• सपोनि/तपास पथक
• मुद्देमाल कक्ष
• गोपनिय कक्ष
• रोखपाल
• हजेरी मास्तर
• महिला कक्ष
• गार्ड रुम
• बारनिशी/समन्सवॉरंट
• क्राईम/MOB
दुसरा मजला
मिटींग हॉल


अभोणा पोलीस ठाणे


Latitude: 20.043795
Longitude: 74.490278
Elevation: 577.24±3 m
Accuracy: 20.4 m
Azimuth: 327° (NW)
Pitch: -7.2° (1.1°)
Time: 04-14-2025 13:09
Note: फोटो





# गुंतवणूक प्रोत्साहन
# ( INVESTMENT PROMOTION )

- टोरंट व अवादा (मुख्यमंत्री सौर उर्जा प्रकल्पांतर्गत) या दोन कंपन्यांमधील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळण्यासाठी बंदोबस्त पुरविण्यात आला.
- उद्योजक व्यापारी व कामगार वर्गाच्या बैठका घेऊन अडचणी सोडवीण्यात आल्या आहेत.
- औद्योगिक परिसरात कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांसोबत नियमित बैठक घेण्यात येते तसेच परिसरात दररोज गस्त करण्यात येते.
- नाशिक ग्रामीण घटकातील वरिष्ठ अधिकारी यांनी उद्योजकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आजपावेतो 88 बैठका घेऊन उद्योग वाढीसाठी पोषक वातावरण तयार करण्यात आले आहे.
- औद्योगिक परिसरात सर्वेक्षण करून एकुण 1998 CCTV कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे गुन्हेगारी घटकांना आळा बसला आहे.
- उद्योजकांना उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्याच्या अनुषंगाने नोडेल अधिकारी नेमण्यात आले आहे.
- सर्व खाजगी व शासकीय उद्योग धंदयांच्या ठिकाणी कामगारांचे संप, जनआंदोलन झाल्यास प्राधान्याने नियमानुसार पोलीस बंदोबस्त देण्यात आले आहेत.

लोकमत

# उद्योगांच्या सुरक्षेसाठी नोडल अधिकारी

## उद्योजकांसमवेत बैठक; पोलिस मित्रांचीही मदत घेणार : विक्रम देशमाने

लोकमत न्यूज नेटवर्क



औद्योगिक सुरक्षेबाबत आयोजित बैठकीत बोलताना पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने, समवेत 'निमा'चे अध्यक्ष धनंजय बेळे, अपर पोलिस अधीक्षक आदित्य मिरखेलकर.

सातपूर : जिल्ह्यातील उद्योगांना सुरक्षा पुरवण्यासाठी पोलिस यंत्रणा कटिबद्ध असून कायदा व सुरक्षा अबाधित राखण्यास विभागनिहाय नोडल अधिकारी नियुक्त केले जातील. उद्योजक आणि पोलिस यंत्रणांच्या प्रत्येकी तीन प्रतिनिधींचा समावेश असलेली संयुक्त समिती गठित करण्यात येईल, असे ठोस आश्वासन जिल्हा पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी उद्योजक संघटनांच्या प्रतिनिधींना दिले.

मुख्यमंत्र्यांनी आखून दिलेल्या सातसूत्री कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी त्यांच्या कार्यालयात 'निमा'सह उद्योजक संघटनांच्या प्रतिनिधींशी बोलताना दिले. देशमाने यांनी पुढे सांगितले की, उद्योजकांना सुरक्षा व्यवस्था प्रदान करण्यास विविध स्तरांवरून सामूहिक प्रयत्न सुरू आहेत. सर्वत्र सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यास जिल्हा नियोजन मंडळातून निधी उपलब्ध व्हावा, यासाठी पावले उचलली जातील, अशी ग्वाही देशमाने यांनी दिली.

अपर पोलिस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी 'आयमा'चे अध्यक्ष ललित बूब, मनीष रावल, उपाध्यक्ष आशिष नहार, सचिन कंकरेज, राजेंद्र कोठावदे, राजेंद्र वडनेरे, ललित सुराणा, राजेंद्र पानसरे, प्रमोद वाघ, राजाराम सांगळे आदींसह 'एमआयटीसी'चे चेतन लोढया, 'आयओसी'चे प्रतिनिधी उपस्थित होते.

### अधिकाऱ्यांना बैठकीत सामावून घ्यावे

उद्योजकांतर्फे 'निमा'चे अध्यक्ष धनंजय बेळे, आयमा अध्यक्ष ललित बूब आणि योगेश पाटील यांनी आपल्या विविध मागण्यांचे सादरीकरण बैठकीत केले. जिल्ह्यातील बहुसंख्य वसाहती ग्रामीण भागात असल्याने तेथील ग्रामसेवक सरपंच यांना विश्वासात घेऊन त्यांची बैठक लावावी. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना बैठकीत सामावून घ्यावे, असे 'निमा'चे अध्यक्ष बेळे यांनी सांगितले.







# क्षेत्रीय कार्यालयांना भेटी
# ( FIELD VISIT )

- सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी जिल्हयातील पोलीस ठाणेस त्यांच्या कामकाजाचे मुल्यांकन करण्यासाठी महिन्यातून दोनदा व पंधरवड्यातून दोनदा भेट दिली जाते. अशा आजपोवेतो एकूण **936** भेटी दिल्या आहेत.
- शाळा, महाविद्यालये व विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सुरक्षात्मक उपाययोजना, सायबर सुरक्षा, रस्ता अपघात संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी आज पावेतो **78** भेटी देण्यात आल्या आहेत.
- **65** सार्वजनिक कार्यशाळा – नागरिकांसाठी नवीन कायदयांबाबत जागरूकता
- वाहतुक नियमण बाबत जिल्हयातील **३२** शाळांवर जिल्हा वाहतुक शाखा, नाशिक ग्रामिण व शहर वाहतुक शाखा मालेगाव यांचेकडुन रस्ता सुरक्षा व वाहतुकिच्या नियमांबाबत जनजागृती करण्यात आली आहे.

# क्षत्रिय कार्यालय भेटी व नवीन कायदे जनजागृती कार्यशाळा (निवडक छायाचित्र)











# अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयीक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

- जिल्हयातील 222 पोलीस अधिकारी व 2950 अंमलदार यांना नवीन तीन कायदे, ई-समन्स, इंट्रॉगेशन सिस्टीम, सायबर क्राईम बाबतचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

- पोलीस अंमलदार संवर्गातील सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करून पदोन्नतीची रिक्त होणारी पदे पदोन्नतीने 10 ASI, 232 पोलीस हवालदार भरण्यात आले आहे.


- तसेच पोलीस अंमलदार यांचे तक्रारींचे निराकरण करणेकरीता ‘समाधान’ हेल्पलाईन व्दारे तात्काळ निराकरण करण्यात येत आहे.





# ई - ऑफीस ( E - OFFICE )

- नाशिक ग्रामीण घटकात दि. 10/08/2024 रोजी पासून प्रशासकिय कामकाजात ई-ऑफिस प्रणालीची सुरूवात झाली असून दि. 01/01/2025 पासून पुर्णपणे पत्रव्यवहार ई-ऑफीस प्रणालीच्या माध्यमातून चालु आहे.
- ई-ऑफीस प्रणालीत प्रकरणांचा निपटारा पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक असे 4 स्तरांवर करण्यात येते.



# नाविन्यपूर्ण उपक्रम १
# बळिराजा सेल

- नाशिक जिल्हयात द्राक्ष उत्पादक शेतकरी यांची व्यापा-यांकडून फसवणुक होण्याचे प्रमाण वाढल्याने त्यांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेता यावी यासाठी नाशिक ग्रामीण घटकात बळीराजा सेल चालू केला आहे. सदर ठिकाणी फसवणूक झालेल्या शेतक-यांच्या तक्रारी प्राप्त करून त्यांचे निराकरण करण्यात येते.

- आजपावेतो बळीराजा हेल्पलाईनवर **958** तक्रारी प्राप्त झाल्या असून एकूण **2,33,42,752/-** रूपये शेतक-यांना परत मिळवून देण्यात आले.

- द्राक्ष उत्पादक शेतकरी यांच्या समस्यांबाबत पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण येथे वेळोवेळी बैठका घेऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण केले जाते.



# बळीराजा सेल अनुषंगाने शेतकऱ्यांच्या घेण्यात आलेल्या बैठका





# नाविन्यपूर्ण उपक्रम २
# COP OF THE MONTH

- 100 दिवस कृतीआराखडा अनुषंगाने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व प्रकरणे जलद गतीने निकाली काढणाऱ्या पोलीस अंमलदारांना ‘COP OF THE MONTH’ म्हणून गौरविण्यात येते.

